

दैनिक सत्यवादी व महिला दक्षता समिती यांच्यावतीने रविवारी कोल्हापुरात विविध क्षेत्रांतील मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. श्री. व्ही. टी. पाटील यांचा सत्कार करताना सहकार राज्यमंत्री प्रकाश आवाडे. शेजारी आमदार दिग्विजय खानविलकर, सौ. ज्योती पुरी व पद्मजा पाटील.

# कोल्हापुरात महिला विद्यापीठ स्थापने आपले एकमेव ध्येय

## व्ही. टी. पाटील यांचे मत

कोल्हापूर, ता. ७-'कोल्हापुरात महाराणी ताराराणीच्या नावे महिला विद्यापीठाची स्थापना, ही आपल्या ध्येयाची एकमेव दिशा आहे,' असे प्रतिपादन शिक्षणमहर्षी व्ही. टी. पाटील यांनी आज येथे व्यक्त केले. दै. 'सत्यवादी' व महिला दक्षता समिती यांच्यावतीने आयोजित केलेल्या गुणवंतांच्या सत्कार सोहळ्यात ते बोलत होते. पालकमंत्री प्रकाश आवाडे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

कोल्हापुरात महिलांसाठी स्वतंत्र विद्यापीठ स्थापन होणे हा ताराराणींच्या कर्तृत्वाला मुजरा ठरेल असे सांगून श्री. व्ही. टी. पाटील म्हणाले, 'शैक्षणिक क्षेत्रात महिलांच्या सहभागाने देशात वेगळी सामाजिक क्रांती घडू शकेल.'

सत्यवादी भवनात झालेल्या या समारंभात पालकमंत्री प्रकाश आवाडे यांच्या हस्ते व्ही. टी. पाटील यांचा सत्कार करण्यात आला. त्याचबरोबर विविध क्षेत्रांत यश मिळवणाऱ्या सौ. सुवर्णा राजेशिर्के, पंकजा तिवडे, उषा पटेल, प्रतिभा जाधव, बानुबी पठाण, वंदना करनुरे, प्रा. रुपा शहा, स्वप्नील रामनामे, शिल्पकार डोंगरसाने यांचाही सत्कार करण्यात आला.

या समारंभात स्वागत साधना झाडबुके यांनी केले. प्रास्ताविक पी. बी. पोवार यांनी केले. आमदार दिग्विजय खानविलकर, पद्मजा पाटील यांची भाषणे झाली.

२ / सकाळ : सोमवार, ८ जानेवारी १९९०

सकाळ :